सकाळ

# महिलांना शिक्षण, रोजगार देण्यास प्राधान्य

## कृषिमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांचे मत, मोफत बियाणे वाटप




**कळंब : आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबातील वारसांना मोफत बियाणे वाटप करताना महसूलमंत्री चंद्रकांत पाटील. यावेळी सुजितसिंह ठाकूर, बी. आर. मेहता, रितू छाब्रिया आदी.**

कळंब, ता. १० (बातमीदार) : शेतकरी आनंदी, सुरक्षित आणि सक्षम करण्यासाठी आम्ही काम करीत आहोत. त्यांच्या हाताला काम, शेतीला पाणी दिले तर त्यांची स्थिती सुधारणार आहे. तसेच महिलांना शिक्षण आणि रोजगार देण्यासाठी केंद्र व राज्य सरकार प्राधान्य देत आहे. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबातील महिला निर्धाराने उभ्या राहताहेत. त्यांना प्रोत्साहन देण्याचा फिनोलेक्स पाइप्स आणि मुकुल माधव फाउंडेशनचा प्रयत्न कौतुकास्पद आहे, असे मत राज्याचे कृषी व महसूलमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी केले.

एकल महिला शेतकरी (आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या पत्नी) सक्षमीकरणासाठी पुण्यातील फिनोलेक्स पाइप्स, त्यांचे सीएसआर भागीदार मुकुल माधव फाउंडेशन व फिक्की फ्लो पुणे चॅप्टर यांच्या पुढाकाराने, पुण्यातील साई मित्रपरिवार, कळंब येथील पर्याय सामाजिक संस्था व कृषी विज्ञान केंद्र, तुळजापूर यांच्या सौजन्याने ४१२ महिला शेतकऱ्यांना शनिवारी (ता. आठ) मोफत सोयाबीन, तुरीचे बियाणे शहरातील रायगड हॉलमध्ये चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते वितरित करण्यात आले. कळंब व वाशी तालुक्यांतील जवळपास ४० गावांतील ४१२ महिला शेतकऱ्यांना प्रत्येकी ३० किलो सोयाबीन, एक किलो तूरडाळीचे बियाणे देण्यात आले.

मुकुल माधव फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू प्रकाश छाब्रिया, आमदार सुजितसिंह ठाकूर, फिनोलेक्स पाइप्सचे उपाध्यक्ष बी. आर. मेहता, फिक्की फ्लो पुणे चॅप्टरच्या सदस्या अनिता सणस, रेखा मगर, अपर जिल्हाधिकारी पराग सोमण, पर्याय संस्थेचे विश्वनाथ तोडकर, मुकुल माधव फाउंडेशनचे बबलू मोकळे, सचिन कुलकर्णी, मंगेश तळेकर, अमोल ठाकरे आदी उपस्थित होते. अनिता सणस यांनी फिक्की फ्लोच्या उपक्रमांविषयी सांगितले. महिलांना साडी-चोळी आणि भेटवस्तू देण्यात आल्या. बबलू मोकळे यांनी सूत्रसंचालन केले.

Aurangabad, Osmanabad-Today
11/06/2019 Page No. 3